<u>मजकुर :–</u>

दिनांक ३१/१२/२०१९ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" BEST DETECTION OF THE MONTH "** <u>माहे ऑक्टोंबर–२०१९</u> या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

<u>बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोंबर – २०१९</u>

| | | |
|---|---|---|
| ०१ | नागपाडा पोलीस ठाणे<br>परिमंडळ–३ | गु.र.क्र. ३६०/१९, कलम ३४१, ३४२, ३५७, ४५२, ३९७ भा.द.वि. |

–:<u>'दरोडा'</u>:–

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :– सदर गुन्हयातील आरोपीतांनी यातील फिर्यादी हे सिक्युरिटी गार्ड म्हणुन काम करीत असलेल्या बाबासाहेब गावडे इन्स्टीटयुट, मराठा मंदीर ॲनेक्स, बाबासाहेब गावडे चौक, मुंबई सेंट्रल, मुंबई –०८ येथील तळमजल्यावरील आय.सी.आय.सी.आय. बॅकेत जबरदस्तीने प्रवेश करून फिर्यादी व त्यांच्यासोबतचा सिक्युरिटी गार्ड परशुराम शाहु गुंडये यांचे डोळे, तोंड व हात बांधुन गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम मशीन फोडण्याचा प्रयत्न केला.

तसेच बॅकेत प्रवेश करावयाचा काचेचा दरवाजा फोडून त्याचे आतील बाजुस असलेले लोखंडी ग्रीलवर असलेले कुलुप गॅस कटरच्या सहाय्याने तोडून बॅकेत प्रवेश केला व आतील बाजुस असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर काळया रंगाचा स्प्रे मारून त्याचप्रमाणे स्मोक अलार्म तोडून समोरील ''व्हॉल्ट रूम '' चा लोखंडी दरवाजा गॅस कटरच्या सहाय्याने तोडण्याचा प्रयत्न केला असून त्यात अपयश आल्याने काऊंटरवरील लॅपटॉप, इन्स्टा मशिन व फिर्यादीचा ओपो कंपनीचा मोबाईल सीम क्र.९३७२८०८६५२, ९८१९०७०४१५ जबरीने चोरी केले. म्हणुन फिर्यादीच्या प्रथम खबरी जबाबावरून बाजूस नमूद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| <u>फिर्यादी</u> | :– | श्री. राकेशकुमार सियाराम शर्मा, वय २९ वर्षे, धंदा–वॉचमन |
| <u>बळीत/मयत</u> | :– | श्री. राकेशकुमार सियाराम शर्मा, वय २९ वर्षे, धंदा–वॉचमन |
| <u>आरोपी अटक व दिनांक</u> | :– | १) अर्जुन किशोर चौधरी, वय २३ वर्षे, धंदा–नोकरी,<br>२) रविकुमार लल्लनप्रसाद गुप्ता, वय २३ वर्षे, धंदा–नोकरी,<br>३) मन्नुकुमार मदन प्रसाद, वय २० वर्षे, धंदा–नोकरी,<br>४) संदिपकुमार राजेंद्र प्रसाद, वय २१ वर्षे, धंदा–नोकरी,<br>५) अमितकुमार ओममप्रकाश सिंग, वय २४ वर्षे,<br>६) रोहितकुमार सुरेंदर चौधरी, वय २१ वर्षे, धंदा–नोकरी,<br>आरोपी क्र. १ :– दिनांक ३०/१०/२०१९<br>आरोपी क्र. २ ते ४ दिनांक ३१/१०/२०१९<br>आरोपी क्र. ५ :– दिनांक ०३/११/२०१९<br>आरोपी क्र. ६ :– दिनांक ०६/११/२०१९ |

| | | |
|---|---|---|
| चोरीस गेलेला माल | | १) एकुण ०६ लॅपटॉप किंमत– रू. ९५,०००/–, २) एक इन्स्टा बॅकींग मशिन अंदाजे किंमत– रू. १०,०००/–, ३) एक ओपो कंपनीचा जुना वापरता मोबाईल अं. किं. रू. ३,०००/–<br>——————————————————<br>एकुण किंमत – रू.०१,०८,०००/– |
| हस्तगत मालमत्ता | | १) एकुण ०५ लॅपटॉप किंमत– रू. ९५,०००/–<br>२) एक इन्स्टा बॅकींग मशिन अंदाजे किंमत– रू. १०,०००/–<br>३) एक ओपो कंपनीचा जुना वापरता मोबाईल अं. किं. रू. ३,०००/–<br>एकुण किंमत – रू.०१,०८,०००/– |

**तपास कौशल्य** :– बाजूस नमूद अधिकारी व अंमलदार यांनी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार स्वतंत्र तपास पथके तयार करून गुन्हयाची खबर मिळाल्यापासून ते गुन्हा उघडकीस येईपावेतो अहोरात्र अखंडीत व अथक तपास केलेला आहे.

यातील सीसीटीव्ही तपास पथकाने सदर गुन्हयाचे अनुषंगाने मुंबईतील नागपाडा, मुंबई सेन्ट्रल ताडदेव, अग्रीपाडा, दादर, बांद्रा, माहिम या ठिकाणच्या जवळजवळ ३० ते ३५ ठिकाणचे सी.सी.टी.व्ही. फुटेजची बारकाईने तपासणी करून यातील संशयीत आरोपींचा माग काढला आहे.

यातील आरोपीतांनी गुन्हयादरम्यान वापरलेले ऑक्सीजन सिलेंडर व ट्रॉली कुठून आणली याचा तपास करण्याकरीता नेमलेल्या पथकाने सदरचे सिलेंडर व ट्रॉली मुंबईत ज्या–ज्या ठिकाणी मिळण्याची शक्यता होती, अशा सर्व ठिकाणी जाऊन त्याबाबत कसून तपास केलेला आहे. त्याकरीता घटनास्थळी आरोपीतांनी सदरचे सिलेंडर व ट्रॉली कसे पोहोचविले त्या संपूर्ण मार्गाचा सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे माग काढलेला आहे.

तसेच पोउनि रामदास कदम व पथकाने मोबाईल टॉवर डम्पडाटा मिळवून त्यावर तासन्तास अहोरात्र वर्कआऊट करून संशयीतांचे मोबाईल नंबर्स मिळविल्यानंतर त्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये मिळून आलेल्या आरोपींताच्या हालचालींशी समन्वय साधून आरोपीतांचा माग काढून त्यांचे ठाव– ठिकाण शोधून काढले व त्याप्रमाणे तीन स्वतंत्र तपास पथके माहिम मुंबई, लखनौ उत्तरप्रदेश व छपरा बिहार या ठिकाणी रवाना करण्यात आली.

आरोपीतांचा अंदाजित ठावठिकाणा मिळाल्यानंतर मिळालेल्या माहितीनुसार प्रथम दि. ३०/१०/१९ रोजी एका आरोपीस गुन्हे प्रकटीकरण पथकाने माहिम येथे पाळत ठेवून ताब्यात घेतले. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे त्याच दिवशी लखनौ व गोरखपुर येथे गेलेल्या पथकाने यातील आरोपीतांची कोणतीही ओळख मिळालेली नसतांना गोरखपुर, उत्तरप्रदेश येथे रेल्वे प्रवासादरम्यान धावत्या ट्रेनमध्ये संशयीतांचा शोध घेवून, गोरखपुर रेल्वे बसस्थानक येथून स्थानीक उत्तर प्रदेश एस.टी.एफ. यांचे मदतीने शिताफीने ३ आरोपींचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. अशाप्रकारे सदरचा गुन्हा ४८ तासाचे आत उघडकीस आणला.

त्यानंतर आणखी एका आरोपीस माहिम, मुंबई येथून व एका आरोपीतास छपरा, बिहार येथून ताब्यात घेऊन नमूद सर्व आरोपीतांकडून गुन्हयात चोरीस गेलेली सर्व मालमत्ता हस्तगत केली व बॅंक दरोडयासारखा गंभीर गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | स.पो.आ. | विनय गाडगीळ | प्रशस्तीपत्र |
| २ | व.पो.नि. | श्रीमती शालीनी शर्मा | प्रशस्तीपत्र |
| ३ | पो.नि. | विदयासागर कालकुंद्रे | प्रशस्तीपत्र |
| ४ | पो.नि. | दुष्यंत चव्हाण | प्रशस्तीपत्र |
| ५ | स.पो.नि. | संदेश मांजरेकर | प्रशस्तीपत्र |
| ६ | स.पो.नि. | धनराज प्रभाळे | प्रशस्तीपत्र |
| ७ | स.पो.नि. | सचिन शिंदे | प्रशस्तीपत्र |
| ८ | पो.उ.नि. | एकनाथ देसाई | प्रशस्तीपत्र |
| ९ | पो.उ.नि. | अमोल तळेकर | प्रशस्तीपत्र |
| १० | पो.उ.नि. | बाळू जाधव | प्रशस्तीपत्र |
| ११ | पो.उ.नि. | संग्राम कदम | प्रशस्तीपत्र |
| १२ | पो.उ.नि. | रामदास कदम | प्रशस्तीपत्र |
| १३ | परि. पो.उ.नि. | सचिन तावरे, | प्रशस्तीपत्र |
| १४ | स.पो.फौ. २५०८८ | दिलीप निगडे | प्रशस्तीपत्र |
| १५ | पो.ना.क्र.०१५६८ | राजकुमार कांबळे | प्रशस्तीपत्र |
| १६ | पो.शि.क्र.०३११९४ | विनोद पाटील | प्रशस्तीपत्र |
| १७ | पो.शि.क्र.०६१४८३ | गौरव सोनवणे, | प्रशस्तीपत्र |
| १८ | पो.शि.क्र.०७०४६३ | संदिप जाधव | प्रशस्तीपत्र |
| १९ | पो.शि.क्र.०९०४३७ | भारत बोडके. | प्रशस्तीपत्र |
| २० | पो.ह.क्र. २८३४७ | भास्कर पाटील | प्रशस्तीपत्र |
| २१ | पो.ह.क्र.९७०५७० | रामदास बागुल | प्रशस्तीपत्र |
| २२ | पो.ना.क्र.३३४१८ | संदिप पाटील, | प्रशस्तीपत्र |
| २३ | पो.ना.क्र.९६०४९२ | धनंजय कांबळे | प्रशस्तीपत्र |
| २४ | पो.ना.क्र.९८०३८० | प्रवीण सावंत | प्रशस्तीपत्र |
| २५ | पो.ह.क्र.२९४६५ | राजेंद्र मंडलीक | प्रशस्तीपत्र |
| २६ | पो.ह.क्र. ३४६८ | भाऊसाहेब जाधव | प्रशस्तीपत्र |
| २७ | पो.ह.क्र. १३९६२ | नंदकिशोर पाडावे | प्रशस्तीपत्र |
| २८ | पो.ह.क्र. ३२१४४ | गोविंद गावडे | प्रशस्तीपत्र |
| २९ | पो.ना.क्र. ९६०२२८ | सुरेश कानडे | प्रशस्तीपत्र |
| ३० | पो.ना.क्र. ३७१४ | किरण मोरे | प्रशस्तीपत्र |
| ३१ | पो.ना.क्र.९८०५७८ | धर्मसिहं राजपुत | प्रशस्तीपत्र |
| ३२ | पो.ना.क्र.००८६७ | विशाल जाधव | प्रशस्तीपत्र |
| ३३ | पो.शि.क्र.०७०५३४ | सचिन गायकवाड | प्रशस्तीपत्र |
| ३४ | पो.ना.क्र. ३४१६५ | समीर जगताप | प्रशस्तीपत्र |
| ३५ | पो.ना.क्र. ०६२५० | अजीम मुलाणी | प्रशस्तीपत्र |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | पो.ना.क्र. ०१६८१ | प्रवीण बोरसे | प्रशस्तीपत्र |
| ३७ | पो.ना.क्र. ०३६१६ | सचिन कातकडे | प्रशस्तीपत्र |
| ३८ | पो.शि.क्र. ११३६११ | सागर कापसे | प्रशस्तीपत्र |